**दि.०७/०२/२०१९ चे**
**बैठकीचे इतिवृत्त**

जा.क्र.मुं.मं./का.अ./बीडीडी-२२६/१८७ /२०१९
दिनांक :-२०/०२/२०१९

विषय :- बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग येथील प्रकल्पाबाबत मा.अध्यक्ष, म्हाडा, मा.आमदार श्री.सुनिल शिंदे व स्थानिक रहिवाशी यांचे समवेत संयुक्त बैठक.

मा.अध्यक्ष म्हाडा यांच्या निर्देशानुसार बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग प्रकल्पाबाबत दि.०७-०२-२०१९ रोजी सायं. ०५.०० वाजता मा. अध्यक्ष/म्हाडा यांच्या दालनात मा.आमदार श्री.सुनिल शिंदे व स्थानिक रहिवाशी यांचे समवेत संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीत खालील सन्माननीय लोकप्रतिनिधी, अधिकारी, बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग येथील रहिवाश्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. उदय सामंत | - मा.अध्यक्ष, म्हाडा |
| २. | श्री. सुनिल शिंदे | - मा. आमदार, वरळी विधानसभा मतदार संघ |
| ३. | श्री. धिरजकुमार पंदिरकर | - उपमुख्य अभियंता / बीडीडी / मुं.मं. |
| ४. | श्री. संजय भागवत | - सहमुख्य अधिकारी / मुं.मं. |
| ५. | श्री. एस.एस. कोन्नूर | - कार्यकारी अभियंता/ बीडीडी / मुं.मं. |
| ६. | श्री. कृष्णकांत नलगे व इतर रहिवाशी, बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग | - |

सदर बैठकीत बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग येथील रहिवाश्यांनी उपस्थित केलेले मुद्दे व त्याबाबतची सद्यस्थिती व झालेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | सद्यस्थिती | बैठकीतील निर्णय | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | ना.म.जोशी मार्ग येथिल प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील भाडेकरुंची अंतिम पात्रता यादी जाहीर करणे | सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांनी पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यातील सात चाळींतील एकूण ५६० भाडेकरुंबाबत पात्रता यादी प्रसिध्द केली असून, ४५१ भाडेकरुंची / लाभार्थ्यांची पहिली अंतिम पात्रता यादी दि.०७-१२-२०१८ व दि.१७-१२-२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यातील १० चाळींतील उर्वरित ३४९ भाडेकरु व चाळ परिसरातील ७८ स्टॉल्स व झोपडीधारक यांच्या पात्रतेबाबत सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.<br>प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील पुनर्वसन इमारतीचे बांधकाम सुरु करण्यासाठी १० चाळीतील भाडेकरुची, ७८ स्टॉल्स / झोपडयांची पात्रता त्वरीत निश्चित होणे आवश्यक आहे. | १) सक्षम प्राधिकारी यांनी उर्वरित ३४९ लाभार्थ्यांची व ७८ स्टॉल्स / झोपडीधारकांची पात्रता कार्यवाही १५ दिवसांत पूर्ण करावी.<br>२) सर्वेक्षणा दरम्यान बंद आढळलेल्या १८ स्टॉल्स / झोपडया यांचे पुढील आठवडयात पुन्हा सर्वेक्षण करावे.<br>३) चाळ क्र.१३ चे सर्वेक्षण पुन्हा करावे. | सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) कुलाबा विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | पहिल्या टप्प्यामध्ये असलेली सरकारी पोलीस कर्मचाऱ्यांची घरे त्वरीत रिकामी करुन म्हाडाने ताबा घ्यावा. | पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात पोलीस विभागाची ताब्यात असलेली व सेवानिवासस्थान म्हणून वितरीत करण्यात आलेली एकूण १२ गाळे प्रकल्पबाधीत होत आहेत.<br>या प्रकल्पाबाधीत १२ गाळयांच्या बदल्यात पोलीस विभागास म्हाडाच्या सेंच्युरी मिल येथील संक्रमण शिबीरातील १-सी इमारतीमधील १०१ ते ११२ अशा एकूण १२ सदनिकांच्या ताबा घेण्यासाठीचा वितरण आदेश दि.२४-०५-२०१८ रोजी देण्यात आला असून अद्याप चाळींतील १२ गाळे पोलीस विभागाने रिक्त केलेले नाहीत. | पोलीस विभागाने १२ संक्रमण गाळे म्हाडाकडून ताब्यात घ्यावेत व ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी चाळीतील चाळ क्र.५ खो.क्र.६१ ते खो.क्र.६४ व चाळ क्र.१२ मधील खो.क्र.६५, खो.क्र.६६,खो.क्र.६८,खो.क्र.६९, खो.क्र.७३ ते खो.क्र.७५ व खो.क्र. ७८ असे एकूण १२ पोलीस निवासस्थाने म्हाडास हस्तांतरित करावीत. | सहपोलीस आयुक्त (प्रशासन) मुंबई पोलीस<br><br>पोलीस उपआयुक्त (प्रशासन) मुंबई पोलीस |
| | | सार्वजनिक बांधकाम विभागाकडे चाळ क्र.१२ मध्ये खो.क्र.१,२व ४ ताब्यात आहेत. तसेच सार्वजनिक बांधकामाचे कार्यालय प्रकल्पाच्या टप्पा -१ मध्ये येते. | चाळ क्र.१२ मधील खो.क्र.१,२व४ व कार्यालयाची इमारत त्वरीत रिक्त करुन म्हाडास हस्तांतरित करावी. | संचालक / बीडीडी वसाहत व्यवस्थापक / बीडीडी, सा.बां.वि. |
| ३. | प्रकल्पाशी असहकार्य करणाऱ्या भाडेकरु विरुध्द निष्कासनाची कायदेशीर कार्यवाही करावी. | बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत असहकार्य करणाऱ्या भाडेकरु विरुद्ध म्हाडा अधिनियम अंतर्गत कलम ९५ (अ) नुसार व चाळीबाहेरील झोपडया / स्टॉल्स यांच्या विरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९७१ अंतर्गत कलम ३३, ३३ (अ), ३८ अंतर्गत निष्कासनाची कार्यवाहीची तरतूद करण्याबाबत शासनास दि.१३-११-२०१७ रोजी प्रस्ताव सादर केला आहे.<br>म्हाडा प्राधिकरणाच्या दि.२४-०१-२०१९ रोजीच्या बैठकीत म्हाडा अधिनियम कलम ९५ (अ) व महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९७१ अंतर्गत कलम ३३, ३३ (अ), ३८ नुसार कार्यवाही करणेबाबत निर्णय झाला असून शासनास कायदेशीर तरतूद करणेबाबत शिफारस करण्यात आली आहे. | या प्रकरणी त्वरीत म्हाडा अधिनियम अंतर्गत कलम ९५ (अ) व महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९७१ अंतर्गत कलम ३३, ३३ (अ), ३८ ची कायदेशीर तरतूद वि.नि.नि. ३३ (९) ब मध्ये करण्यासाठी अधिसूचना जारी करावी. | नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन<br>गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | बीडीडी चाळीमधील अनिवासी गाळेधारकांना १६० चौ.फूट चटई क्षेत्रफळाच्या गाळा/ सदनिकेऐवजी ३०० चौ.फूट चटई क्षेत्रफळाची सदनिका अनुज्ञेय करावी. | सदरील प्रकरणी शासनास अहवाल सादर करण्याबाबत मा.राज्यमंत्री / गृहनिर्माण यांनी दि.१६-११-२०१८ च्या बैठकीत म्हाडास निर्देश दिले आहेत.<br>तसेच या प्रकरणी प्राधिकरणाच्या बैठकीत बाब टिप्पणी सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष / म्हाडा यांनी निर्देश दिले आहेत. | सदरील प्रकरणी बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या दि.११-०२-२०१९ रोजी होणा-या बैठकीत सादर करावी. | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार / प्रा.<br><br>वास्तुशास्त्रज्ञ / मुंबई मंडळ |
| ५. | प्रकल्प कामात काही व्यक्ती / रहिवाशी जाणूनबुजून अडथळा निर्माण करतात. त्याच्या विरुध्द कार्यवाही व्हावी. | --- | प्रकल्प कामात वारंवार अडथळा आणणाऱ्या व्यक्तीं विरुध्द पोलीसात तक्रार दाखल करावी. तसेच आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त सदरील शासकीय प्रकल्पास त्वरीत उपलब्ध करुन दयावा. | कार्यकारी अभियंता / उपअभियंता बीडीडी / मुंबई मंडळ<br><br>वरिष्ठ पोलीस निरीक्षक ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे |
| ६. | ना.म.जोशी मार्ग येथे प्रत्यक्ष जागेवर संक्रमण गाळयांच्या करारपत्राचे ऑनलाईन पंजीकरण त्वरीत सुरु करावे. | ना.म.जोशी मार्ग प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील ४५१ पात्र भाडेकरुपैकी ३९१ लाभार्थ्यांनी संक्रमण गाळा वितरण आदेश व करारनामा स्विकारले आहेत. यापैकी दि.०७-०२-२०१९ पर्यंत २९२ लाभार्थ्यांनी करारनामा स्वाक्षरी करुन पंजीकरणासाठी म्हाडास हस्तांतरीत केले आहेत.<br>ना.म.जोशी मार्ग येथील प्रकल्पाच्या जागेवर ऑनलाईन पंजीकरणाबाबत आवश्यक कार्यवाही पूर्ण झाली आहे व म्हाडास मुद्रांक कार्यालयाकडून आवश्यक परवानगी मिळाली आहे. व लवकरच प्रत्यक्ष ऑनलाईन पंजीकरणाची कार्यवाही सुरु करण्यात येईल. | ऑनलाईन पंजीकरणाचे काम त्वरीत सुरु करावे. | सहमुख्य अधिकारी / मुंबइ मंडळ<br><br>मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी / प्रा.<br><br>श्री.भिसे, उपसमाज विकास अधिकारी |

शेवटी उपस्थितांचे आभार मानून चर्चा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**मा. अध्यक्ष / म्हाडा यांच्या मान्यतेने**

20/2/19
( डी.एस.पंदिरकर )
उपमुख्य अभियंता / बीडीडी
मुंबई मंडळ

प्रत : मा.आमदार श्री. सुनिल शिंदे यांना माहितीसाठी सादर.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी सादर -

१) अपर मुख्य सचिव / गृहनिर्माण / महाराष्ट्र शासन.
२) प्रधान सचिव / नगर विकास विभाग / महाराष्ट्र शासन.
३) सहआयुक्त (प्रशासन) / मुंबई पोलीस.

प्रत : माहितीसाठी सादर -

४) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / म्हाडा.
५) मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ
६) मुख्य अभियंता - २ / प्राधिकरण.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी -

७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार / प्राधिकरण.
८) सहमुख्य अधिकारी / मुंबई मंडळ.
९) कार्यकारी अभियंता / बीडीडी / मुंबई मंडळ.
१०) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे
११) उपअभियंता / बीडीडी (ना.म.जोशी मार्ग)
१२)सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) कुलाबा विभाग.
१३) मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी / प्राधिकरण.
१४) वास्तुशास्त्रज्ञ / मुंबई मंडळ.
१५) श्री. यु.एस.भिसे / उपसमाज विकास अधिकारी.
१६) श्री. कृष्णकांत नलगे व इतर रहिवाशी, बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग.

प्रत माहितीसाठी

१७) स्विय सहाय्यक, मा.अध्यक्ष / म्हाडा यांचे कार्यालय.
१८) स्वीय सहाय्यक, मा.सभापती / मुंबई मंडळ यांचे कार्यालय.